**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६७ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २१४** **दिनांक — ३१/१०/२०२५**

**विभाग — सार्व.बांध विभाग**

---

प्रस्तावाचा विषय — चांदणी चौकाचे नाव बदलून रामायण रचियता “ **महर्षी वाल्मिकी चौक** ”असे नामकरण करणे बाबत.

- -**--

**ठराव** — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, मा. आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार व दि. 12/08/2025 रोजी उपअभियंता यांचे मा. आयुक्त साहेब यांचे समवेत झालेल्या चर्चे नुसार रस्ते, चौक, मनपा इमारती व सार्वजनिक ठिकाणांना नांव देणे बाबत मानक कार्यपध्दती (SOP) तयार करणे बाबत आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार मानक कार्यपध्दती (SOP) तयार करण्याचे काम चालू आहे. परंतु मा. आयुक्त साहेब यांच्या वेळोवेळी दिलेल्या तोंडी निर्देशानुसार रस्ते, चौक, मनपा इमारती व सार्वजनिक ठिकाणांना नांव देणे बाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

वरील संदर्भान्वये चांदणी चौकाचे नाव बदलून रामायण रचियता " महर्षी वाल्मिकी चौक " असे नामकरण करणे बाबत मा. आमदार संग्राम पार्वती अरुणकाका जगताप यांचे पत्र. व श्री सनी भैय्या खरारे- जिल्हाध्यक्ष अखिल भारतीय वाल्मिकी समाज संघटना यांचे संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजूरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतूद खालील प्रमाणे आहे.

1) अनुसूची ड, प्रकरण ११ मधील २ रस्त्यांना नावे देणे आणि (जागांना) क्रमांक देणे १ अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये विहित असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल, ते नांव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

2) प्रक्ररण-२९ नियम, उपविधी विनियम व स्थायी आदेश मधील कलम ४५७ या बाबीसाठी नियम, करता येतील त्या बाबी मधील अ.क्र. १० रस्ते मधील क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नांवे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांचा क्रमांक देणे) याबाबींसाठी नियम करता येईल.

3) चांदणी चौक हा खालील प्रमाणे आहे.

1) चांदणी चौक ते छत्रपती संभाजीनगर रोड हा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा आहे.
2) चांदणी चौक ते पुणे रोड हा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा आहे.
3) चांदणी चौक ते सोलापूर रोड हा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा आहे.
4) चांदणी चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय रोड हा अहिल्यानगर महानगरपालिकेच्या मालकीचा आहे.

वरिल चार रस्त्याचा मिळून चौक तयार होतो. सदर रस्त्यास पुर्वापार चांदणी चौक असे नांव आहे. सदर चौकास रामायण रचियता "महर्षी वाल्मिकी चौक" नांव देणे बाबत संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे. परंतु एकूण चार रस्त्याचे, तीन रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन व एक रस्ता अहिल्यानगर महानगरपालिकेचा आहे. त्यामुळे वरील पैकी चौथ्या रस्त्याची मालकी संबंधी मनपाचे नगररचना विभाग मा. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

यास्तव अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील जुने जिल्हाअधिकारी कार्यालय जवळील संत आण्णा चर्च ते चांदणी चौकास मिळाणा-या रस्त्याच्या चौकास चांदणी चौक हे नाव बदलून रामायण रचियता “ **महर्षी वाल्मिकी चौक** ”असे नामकरण करणेस व येणा-या खर्चास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---------------------------------------------------------------------------------------------------

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
**( मेहेर लहारे )**
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६७ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २१५** **दिनांक — ३१/१०/२०२५**

**विभाग — मार्केट विभाग**

---

प्रस्तावाचा विषय — माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिराच्या दक्षिणेकडील सि.स.नं. ४६८५/१/२ ही जागा विशाल गणपती मंदिर ट्रस्टला भाडेतत्वावर देणेबाबत.

- -**--

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, शासन निर्णयानुसार गठीत समितीची स्थापन करण्यात आलेली आहे. त्यानुसार दिनांक १७/०६/२०२५ रोजी दुपारी ०५.००वा. गठीत समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये मा. आयुक्त तथा प्रशासक (समितीचे अध्यक्ष) यांनी नगररचना विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका यांच्याकडुन खुली जागेचे भाडे व अनामत रक्कम प्रमाणित करुन घेणे बाबत आदेशित केलेले होते.

त्यानुसार या विभागाने नगर रचना विभागास खुली जागेचे भाडे व अनामत रक्कम प्रमाणित करुन देणे बाबत विनंती करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने नगर रचना विभागाने खुल्या जागेचे मासिक भाडे रु. ७२५०/- व एक वर्षाचे भाडे इतकी रक्कम अनामत घेणे योग्य होईल, असे कळविलेले आहे. तसेच मा. सहाय्यक जिल्हा निबंधक (मुद्रांक), जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांना नगर रचना विभागाने ठरवुन दिलेले जागेचे भाडे व अनामत रक्कम योग्य आहे किंवा कसे? या बाबत सविस्तर अहवाल देणेस विनंती करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने मा. सहाय्यक जिल्हा निबंधक (मुद्रांक), जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांनी माळीवाडा येथील सि.स.नं. ४६८५/१/२ या मिळकतीचे सन २०२५-२०२६ चे मुल्यांकन रु. ३६,२४,०६०/- इतके परिगणित होत आहे, असे कळविलेले आहे. त्यानुसार या विभागाने दिनांक २९/०७/२०२५ रोजी नगर रचना विभाग, अहिल्यानगर महानगरपालिका व मा. सहाय्यक जिल्हा निबंधक (मुद्रांक), जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांनी ठरवुन दिलेले मुल्यांकन हे एकच असल्याचे निदर्शनास आल्याने गठीत समितीची तारीख व वेळ मिळणेचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावावर मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिनांक ०५/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. बैठक आयोजित करणेबाबत आदेशित केलेले आहे.

त्यानुसार दिनांक ०५/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. गठीत समितीचे सदस्य यांना सदर बैठकीसाठी उपस्थित राहणे बाबत कळविण्यात आलेले होते. सदरच्या दिवशी मा.आयुक्त तथा प्रशासक यांना स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका -२०२५ बाबत मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक येथे बैठक असल्याने सदर गठीत समितीची बैठक होवु शकलेली नाही. त्यामुळे या विभागाने दिनांक १४/०८/२०२५ रोजी ई-ऑफिसव्दारे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी मान्यता दिलेली आहे व दिनांक ०३/१०/२०२५ रोजी दुपारी ४०० वा. गठीत समितीची बैठक आयोजित करणेबाबत भ्रमणध्वनीव्दारे सुचित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने सदर गठीत

समितीपुढे माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिराच्या दक्षिणेकडील सि.स.नं.४६८५/१/२ ही जागा विशाल गणपती मंदिर ट्रस्टला भाडेतत्वावर देणेचा विषय मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या समोर

दिनांक ३/१०/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता घेण्यात आलेला आहे. सदर बैठकीस सर्व सदस्य उपस्थित होते. त्यानुसार सदर बैठकीमध्ये खालील प्रमाणे म्हणणे मांडण्यात आलेले आहे

1) अहिल्यानगर महानगरपालिका मालकीची सि.स.नं. ४६८५/१/२ ही खुली जागा क्षेत्र २९६.१२ चौ.मी. पैकी २०९.०० चौ. मी. इतकी खुली जागा वाहन तळ (पार्किंग) वापरासाठी देण्यात यावी.
2) नगररचना विभाग, अहिल्यानगर व मा. सहाय्यक जिल्हा निबंधक (मुद्रांक), जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांनी ठरवुन दिलेले मुल्यांकन एकच असल्याने मासिक भाडे रु.७,२५०/-

(कराविरहित) व एका वर्षाचे भाडे म्हणुन अनामत रक्कम रु.८७,०००/- घेण्यात यावे. अनामत रक्कम १५ दिवसाच्या आत सदर ट्रस्टकडुन रोख स्वरुपात घेण्यात यावी.

3) सदरची जागा ही या पुर्वी मा. महासभा ठराव क्र.२७ दिनांक ३०/१२/२०१७ अन्वये पारित झालेल्या ठरावानुसार ९९ वर्षासाठी न देता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ ( ग ) (५) नुसार नेहमीच्या अटी शर्तीनुसार २९ वर्षासाठी भाडे तत्वावर देणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे मंजूरिस्तव पाठविणेस यावे. तसेच मा. दुय्यम निबंधक, अहिल्यानगर यांच्याकडेस स्वखर्चाने करारनामा नोंदणीकृत करुन घेण्यात यावा.
4) सदर खुली जागेवर भविष्यात बांधकाम करणे झाल्यास त्याची नियमानुसार परवानगी घेणे बंधनकारक राहील.

तसेच महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण भाग चार-ब असाधरण क्रमाक ४१८ दि. ०६ नोव्हेबर २०२३ च्या अधिसुचना नुसार कार्यवाही करणेस व वरील प्रमाणे कार्यवाही करणेस व मा. दुय्यम निबंधक, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्याकडेस नेहमीच्या अटी व शर्तीनुसार १५ दिवसाच्या आत अनामत रक्कम रु.८७,०००/- मार्केट विभागामध्ये रोखीने भरणा करुन स्वखर्चाने नोंदणीकृत करारनामा करूण घेणेस व तसे विशाल गणपती मंदिर ट्रस्ट, अहिल्यानगर यांना कळविणेत यावे यास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे. संबंधीत विभागाने या बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६७ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २१६** **दिनांक – ३१/१०/२०२५**

**विभाग – मार्केट विभाग**

---

प्रस्तावाचा विषय – कलिंगा ग्रामोदय संस्था सावेडी अहिल्यानगरच्या भाडे करारात २८ वर्षाची मुदतवाढ मिळणे बाबत.

- -**--

ठराव – विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, कलिंगा ग्रामोदय संस्था सावेडी, अहिल्यानगर यांनी वरील अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये मागील वर्षी दि. ०९/१०/२०२५ रोजी सावेडी भागातील चैतन्य नगर येथे महानगरपालिकेच्या सावेडी स. नं. १०३ पैकी या जागेमध्ये बांधलेल्या हॉलचे क्षेत्र ३२८.७२ चौ. मी. इतके असुन तो दरमहा भाडे रु. १ व अनामत रक्कम रु. १२ घेऊन ३ वर्ष कराराने दि. ०७/१०/२०२५ रोजी केलेल्या करार नाम्यात अटी आणि शर्तीच्या अधीन राहुन भाडे तत्वावर देण्यात आला होता व त्या बाबतचा प्रत्यक्ष ताबा संस्थेला मिळाला. आमची आपल्याला अशी विनंती की, सदर भाडे करार हा आमच्या संस्थेला 28 वर्षाच्या कालावधी करता वाढवुन मिळावा, असा प्रस्ताव राज्य सरकारकडे करावा ही विनंतीः संस्था कायमच विविध समाजपयोगी उपक्रम करण्यास अग्रेसर व येथुन पुढेही राहील. तसेच महानगरपालिकेने केलेल्या सहकार्याबद्दल ऋणी राहिले, असा अर्ज सादर केलेला आहे.

या बाबत परिस्थिती अशी की, मार्केट विभागाने मे. कलिंगा ग्रामोदय संस्था सावेडी, अहिल्यानगर यांना सदरचा हॉल भाडे तत्वावर देणेसाठी दि. १८/०५/२०२५, दि.२०/०७/२०२५, दि.२४/०७/२०२५ व दि. ०२/०९/२०२५ रोजी प्रस्ताव सादर केलेले आहे. सदर प्रस्तावानुसार वरील सावेडी भागातील चैतन्य नगर येथे महानगरपालिकेच्या सावेडी सर्व्हे नं. १०३ पैकी जागेमध्ये बांधलेल्या योगा हॉलचे क्षेत्र ३२८.७२ चौ. मी. इतके आहे. सदरचा योगा हॉल कलिंगा ग्रामोदय संस्था, सुयोग हौसिंग सोसायटी, प्रोफेसर कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर यांनी आमची संस्था नोंदणीकृत असुन संस्थे मार्फत महिलांना तसेच युवतींच्या कलागुणांना व आत्मनिर्भर बनविण्यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविते तसेच महिलांना योगासने व विविध व्यायाम प्रकार तसेच महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी कार्य केले जाते. यासाठी महानगरपालिकेच्या मालकीचा योगा हॉल मिळणे बाबत मागणी केली आहे.

सदर संस्थेचे सामाजिक कार्य पहाता योगा हॉल नाममात्र दराने तीन वर्षाकरीता भाडेपट्ट्यावर देणेबाबत कार्यवाही करावी. सदर संस्था योगा हॉलचा वापर करणार असल्याने या हॉलची देखभाल दुरुस्तीचे कामे संस्थेकडुन करुन घेण्यात यावीत. यास मा. प्रशासक सर्व साधारण सभेची मंजुरी देण्यात येत आहे, असा ठराव पारित करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर संस्थेने करारनामा करुन सदर हॉलचा प्रत्यक्ष ताबा दिनांक ०९/१०/२०२५ रोजी देण्यात आलेला आहे.

वरील अर्जामध्ये सदर भाडे करार हा आमच्या संस्थेला २८ वर्षाच्या कालावधी करता वाढवुन मिळावा, असा प्रस्ताव राज्य सरकारकडे करावा, असा अर्ज सादर केलेला असल्याने सावेडी भागातील चेतन्य नगर येथे महापालिकेच्या सावेडी सर्व्हे.नं. १०३ पैकी या जागे मध्ये बांधलेल्या हॉल चे क्षेत्र ३२८.७२ चौ.मी इतके आसून सदर संस्था योगा हॉलचा वापर करणार असल्याने या हॉलची देखभाल दुरुस्तीचे कामे संस्थेकडुन करुन घेण्यात यावीत दर महा भाडे रू.१ व अनामत रक्कम १२ रू. घेवुन मे. कलिंगा ग्रामोदय संस्था, सुयोग हौसिंग सोसायटी, प्रोफेसर कॉलनी, सावेडी, अहिल्यानगर यांना महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण भाग चार-ब असाधरण क्रमाक ४१८ दि. ०६ नोव्हेबर २०२३ च्या अधिसुचना नुसार सदरची जागा २८ वर्षाचा कालावधी करिता मुदत वाढवुन देण्यास मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे. संबंधीत विभागाने या बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ - २०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६७ विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - २१७** **दिनांक — ३१/१०/२०२५**
**विभाग — घनकचरा विभाग**

---

प्रस्तावाचा विषय — कोव्हीड प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी संस्थात्मक विलगीकरण करण्यात आलेल्या संशयीत व रूग्णांकरिता चहा, नाष्टा जेवण पुरविलेबाबतच्या कामाची अनामत रक्कम परतावा करणेबाबत.

- -**--

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार, कोव्हीड-19 प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून संस्थात्मक विलगीकरण करण्यात येणा-या संशयीत व रुग्णांकरिता चहा, नाष्टा व जेवण पुरविणेकामी जाहीर ई-निविदा क्र.६७२१५८-१ राबवून मे. जयेश केटरर्स, अहमदनगर संस्थेस कार्यारंभ आदेश देण्यात आलेला होता. त्यांचे काम संपुष्टात आल्याने सदर संस्थेने संदर्भान्वये भरण्यात आलेली रक्कम रु. ४९,०५०/- व देयकातून वजा करण्यात आलेली रक्कम रु.३०७४/- असे एकूण रक्कम रु.५१,१२४/- परतावा करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने रितसर कार्यालयीन प्रस्ताव मंजुर झालेला होता व त्याअनुषंगाने नमुना नं.२२ भरुन देयकाची नोंद के.डी.एम.सी.प्रणालीमध्ये देयकाची नोंद करतेवेळी रक्कम रु. ४९,०५०/- ही रक्कम योग्य दर्शविण्यात येते परंतु पुरवठादाराचे नाव हे जयेश केटरर्स न येता हैदरखान गुलाबखान पठाण असे येत असून सदरकामी देयक अदा करणेकामी अडचण निर्माण होत असून सदरबाबत के.डी.एम.सी. प्रणालीचे प्रतिनिधी यांचेशी संपर्क साधला असता के.डी.एम.सी प्रणालीमध्ये दुरुस्ती करणे शक्य नसल्याबाबत सांगण्यात आलेले आहे.

त्याप्रमाणे अर्जदार संस्था मे. जयेश केटरर्स यांची अनामत रक्कम रु.४९,०५०/- ही इतर लेखाशिर्ष यामध्ये वर्ग करुन अदा करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव व लेखा विभागास आदेशार्थ प्रस्ताव सादर केला असता तसेच लेखा विभागाकडे समक्ष चौकशी केली असता तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्यामुळे सदर प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे

तरी अर्जदार संस्था मे. जयेश केटरर्स यांची अनामत रक्कम रु.४९,०५०/- अदा करणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

( सही )
( मेहेर लहारे )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

( सही )
( यशवंत डांगे )
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका